# जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे

---

## जाहीर सूचना
## दिनांक – २३/०४/२०२६

विषय :- eCourts Services मोबाईल ॲपची सुधारित आवृत्ती, म्हणजेच Version 4.0 च्या प्रारंभाबाबत व डेटा बॅकअप संदर्भात सूचना.

संदर्भ :- मा. केंद्रीय प्रकल्प समन्वयक, उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील दि. २०/०४/२०२६ रोजीचा ई-मेल.

-/ उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., धुळे यांचे आदेशान्वये या सूचनेद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. ई-कमीटी सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दि. ११ व १२ एप्रिल, २०२६ रोजी आयोजित 'National Conference on Judicial Process Re-englineering and Digital Transformation' या राष्ट्रीय परिषदेदरम्यान eCourts Services मोबाईल ॲपची सुधारित आवृत्ती, म्हणजेच Version 4.0 सादर करण्यात आलेले आहे. सदरील सुधारीत आवृत्ती दि. ५ मे, २०२६ रोजीपासून कार्यान्वित होणार आहे. त्याअनुषंगाने, eCourts Services Mobile App वापरणा-या सर्व वापरकर्त्यांना पुढील सूचना देण्यात येत आहेत.

१. सध्या वापरात असलेल्या मोबाईल ॲपमधील जतन केलेल्या प्रकरणांचा/माहितीचा बॅकअप घ्यावा, जेणेकरुन आवृत्ती बदलाच्या प्रक्रियेदरम्यान कोणतीही माहिती नष्ट होणार नाही.

२. सुधारित आवृत्तीतील नवीन सुविधांची माहिती करुन घ्यावी. (User Manual व Video जिल्हा न्यायालयाचे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

सदर जाहीर सूचना खालील ठिकाणी प्रसिध्द करण्यात यावी.

१. जिल्हा न्यायालयाचे अधिकृत संकेतस्थळ.
२. ई-सेवा केंद्रे.
३. जिल्हा न्यायालय व अधिनस्त सर्व तालुका न्यायालय परिसरातील सूचना फलक.

सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी व आवश्यक ती कार्यवाही करावी.

आदेशावरुन

प्र. प्रबंधक
जिल्हा न्यायालय, धुळे

सोबत :- eCourts Services मोबाईल ॲप Version 4.0 चे माहितीपत्रक.

/home/ubuntu/Desktop/forwarding letter2026.odt